# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी** –(०२१८९) २३३००१ **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

**(५०) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक २०/११/२०२०**

| मागील आठवडयातील हवामान (दि.१४.११.२०२० ते २०.११.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.२१.११.२०२० ते २५.११.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी.) | ७.० | ४.० | २.० | ०.० | ०.० |
| ३४.२ | ३४.६ | ३४.६ | ३५.१ | ३५.२ | ३३.८ | ३२.७ | कमाल तापमान (अं. से.) | ३४.० | ३४.० | ३२.० | ३२.० | ३२.० |
| १९.९ | १९.२ | २१.० | २१.६ | २१.३ | २१.७ | २०.६ | किमान तापमान (अं. से.) | १९.० | १९.० | १८.० | १६.० | १६.० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | अंशतः ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | ढग स्थिति (आकाश ) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ७० | ६८ | ७० | ७१ | ७० | ७९ | ८५ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ६६ | ६८ | ६४ | ५२ | ४३ |
| ४५ | ३४ | ३१ | ३३ | ३७ | ४४ | ४८ | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ३८ | ४० | ४७ | ३६ | २७ |
| १.९ | १.९ | १.८ | १.८ | १.९ | ३.७ | ४.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १०.० | ९.० | १२.० | ११.० | ११.० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २०, २१, २२ नोव्हेंबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे तर दिनांक २३, २४ नोव्हेंबर २०२० रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस ते ३४ अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान १६ ते १९ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते १२ कि.मी. पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ खरीप पिकांची काढणी, मळणी पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून करावी व सदर पिकांचे पावसाने नुकसान होऊ नये याकरिता काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>➢ पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकांवर किटकनाशकांची, बुरशीनाशकांची फवारणी करावी.<br>➢ शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगा संदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>➢ शेतकरी बांधवांनी स्वतःजवळ अँन्ड्रॉईड मोबाईल असल्यास हवामान आधारित शेतीविषयक सल्लासाठी गूगल प्ले स्टोअर वरुन **"मेघदूत" ॲप** तर मेघगर्जना व वीजांचा कडकडाट ई. च्या अंदाजांसाठी **"दामिनी " ॲप** डाऊनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगा संदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास योग्य त्या उपाययोजना कराव्यात. |
| **उस** | **पूर्व हंगामी उसाची लागवड** | पूर्व हंगामी ऊस लागवड जमिनीमध्ये वापसा आल्यावरच करावी. पूर्वहंगामी उसाची लागवड १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या दरम्यान करतात. लागवडीकरिता को- ८६०३२ (निरा), को- ९४०१२(फुले सावित्री), को- ८०१४, को.एम. ०२६५ (फुले -२६५), फुले १०००१ या वाणांची शिफारस आहे. बीजप्रक्रिया: ऊस बेणे लागवडी पूर्वी १० लिटर पाण्यात डायमेथोएट ३०% प्रवाही २६.३ मि.ली. + १० ग्रॅम कार्बेन्डाझिमची १० मिनिटासाठी बेणे प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्य रोग व खवले किडीचा बंदोबस्त होतो.<br>**आडसाली ऊस** : आडसाली ऊस लागणीस १२ ते १६ आठवडे झाले असल्यास नत्र खतांची मात्रा ४० किलो नत्र (युरिया ८७ किलो ) प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावी. |
| **गहू** | **उगवण** | गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवडयास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरणी करणे टाळावे.<br>पेरणी नंतर जरूरी प्रमाणे १ किंवा २ वेळा खुरपणी करावी. पिकाच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरुवातीपासूनच तण विरहित ठेवावे. |
| **रब्बी ज्वारी** | **वाढीची अवस्था** | रब्बी ज्वारी पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा १० % पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनेटोराम ११.७% एस. सी. ५ मिली किंवा थायमेथाक्झॉम १२.६ % + लॅमडासायहॅलोथ्रीन ९.५ % झेड. सी. २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मका** | **वाढीची अवस्था** | मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा १० % पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनेटोराम ११.७% एस. सी. ५ मिली किंवा थायमेथाक्झॉम १२.६ % + लॅमडासायहॅलोथ्रीन ९.५ % झेड. सी. २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी** –(०२१८९) २३३००१ **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **तूर** | **शेंगा भरणे अवस्था** | शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी २.५ मिली स्पिनोसॅड ४५ % प्रवाही प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलावर मरुका अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास तुरीच्या फुलावर अझाडीरेक्टिन १५०० पी.पी.एम. ५० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.शेंगा पोखरणाऱ्या अळीचा (हिरवी अळी) प्रादुर्भाव दिसल्यास एच.एन.पी.व्ही. या विषाणूची १० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **हरभरा** | **वाढीची अवस्था** | हरभरा पिकाच्या जोमदार वाढीसाठी शेत सुरुवातीपासूनच तणविरहीत ठेवावे. पिक २० दिवसाचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी. आणि पिक १ महिन्याचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी शक्यतो वापस्यावर करावी. कोळपणी नंतर एक खुरपणी करावी. |
| **कांदा** | **वाढीची अवस्था** | कांदा पिकावरील करपा या रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५ (०.३%) किंवा टेब्युकोनॅझोल (०.१%) हे बुरशीनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. |
| **डाळिंब** | **हस्त बहार कीड व रोग व्यवस्थापन** | **फुलधारणा**: अझॅडीरॅक्टीन / निम तेल (१००० पीपीएम ) करंज बियांचे तेल ३ मिली/ली. + किंवा स्पिनेटोरम १२ % एस. सी. १.० मिली किंवा स्पिनोसॅड ४५ % एस सी. ०.५ मिली + स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली/ली या प्रमाणे फवारणी करावी.<br>**फळधारणा/फळवाढ :-** सायंट्रानिलिप्रोल किंवा क्लोरॅनट्रॅणीलीप्रोल १८.५ एस सी किंवा टोलफेणपायराड १५ % एस सी किंवा फ्लोनिकासिड ५० % ड्ब्ल्यु जी ०.७५-१.० मिलि / लि. + ०.२५ मिलि स्टीकर स्प्रेडर प्रती १ लीटर या प्रमाणे फवारणी करावी. |
| **द्राक्ष** | **फूल ते फळ धारणा अवस्था** | द्राक्ष बागेतील कूज (फुल नेक्रोसिस) ची समस्या टाळण्यासाठी फुलांच्या फूल ते फळ धारणेच्या अवस्थेआधी नायट्रोजन आधारित खत वापरू नये . कूज (फुल नेक्रोसिस) च्या समस्या टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी द्राक्ष वेली अंतर्गत सूर्यप्रकाश आणि हवेच्या हालचालीसाठी क्यानोपी व्यवस्थापन करावे .<br>फूल अवस्थेदरम्यान कमी तापमान आणि ढगाळ वातावरण असल्यास सल्फेट ऑफ पोटॅश (एसओपी) ची मात्रा दिली नसल्यास १५ किलो सल्फेट ऑफ पोटॅश (एसओपी) द्यावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी द्यावे. दुभत्या जनावरांच्या आहारामध्ये १ टक्के खनिज मिश्रणाचा समावेश करावा. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**

ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.
दि. : २० नोव्हेंबर २०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**